# <u>औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद</u>

**<u>दिनांक २०.४.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>**

शुक्रवार **दिनांक २० एप्रिल २००७** रोजी मा.महापौर डॉ.भागवत किसनराव कराड यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ''येथे दुपारी ४.०५ वाजता **''वंदेमातरम्**''या गिताने सुरू झाली.सभेला मा.आयुक्त तसेच नगरसचिव यांचेसह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
०२. स.स.श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे
०३. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
०४. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१३. स.स.सौ.आशन्ना लक्ष्मी शंकर
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२१. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२२. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२३. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२४. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२५. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२६. स.स.सौ.खान अजरा जबीन मसुद

२७. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
२८. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२९. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३०. स.स.सौ.यास्मिन बेगम अ.कदिर
३१. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३२. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
३३. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्यीन
३४. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३५. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३६. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३७. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
३८. स.स.श्री.खान निसार मो.खान
३९. स.स.श्री.शेख इब्राहीम शेख इमाम
४०. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४१. स.स.श्रीमती मुमताज बेगम वाहेद खान
४२. स.स.सौ.राऊत छाया विलास
४३. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४४. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४५. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४६. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४७. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४८. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
४९. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५०. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५१. स.स.सौ.खान जहुरबी नासेर
५२. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५३. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५४. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५५. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५६. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५७. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
५८. स.स.श्री.खुडे विजय किसन
५९. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६०. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६१. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६२. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६३. स.स.श्री.भगवान देविदासराव घडमोडे

६४. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
६५. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६६. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६७. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६८. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६९. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७०. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७२. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
७३. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७४. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७५. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
७६. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
७७. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७८. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
७९. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८०. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल

**चर्चा :**

श्री.सिताराम सुरे : अनेक वेळा मागणी करून माझ्या वार्डात पिण्याचे पाणी दिले जात नाही.

(याच वेळी स.सदस्य श्री.सिताराम सूरे यांनी मा.महापौर डायस समोर बाटलीतील रॉकेल अंगावर ओतून घेत होते.काही सदस्यांनी व सुरक्षा रक्षकांनी त्यांना रॉकेल अंगावर ओतल्या पासून रोखले व त्यांच्या हातातील बाटली हिसकावून घेतली यावेळी सभागृहात काही स.सदस्यांचे मोठमोठयाने बोलणे चालू होते.)

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर : ज्या २४ वार्डात दररोज पाणी दिले जाते ते पाणी कमी करून इतर ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. ही पध्दत चांगली नाही.

श्री.महेश माळवतकर : शेवटच्या घटकेपर्यत यावे लागते. शहरात सगळयांना पाणी दयावे. अनधिकृत वसाहतीत पाणी दिले जाते ते टॅकर दिले जाते. व ज्या भागात जनता कर भरणा करतात तेथे पाणी दिले जात नाही काही भागात दोन वेळेस पाणी काही भागात अनेक वेळ पाणी दिले जाते. सिडको हडको भागात एक दिवसाआड पाणी दिले जाते तेही पूरेसे नाही. असे असतांना पाणीपट्टी पूर्ण वर्षाची घेतली जाते. एक स. सदस्यांना सभागृहात अशी वेळ येते ही बाब योग्य नाही. अनेक वेळा पाण्यासाठी सभागृहात चर्चा झाली या बाबतीत प्रशासनाने काय भूमिका घेतलेली आहे याचा विचार करणार की नाही.

श्री. प्रशांत देसरडा : मागिल बैठकीत स.सदस्य श्री.सुरे यांनी वार्डात पाणी दिले नाही तर येणाऱ्या बैठकीमध्ये आत्महत्या करील असा इशारा दिला होता. एक वर्षापासून पाणी देण्यासाठी स.सदस्य प्रशासनाकडे मागणी करीत आहे. जी भूमिका त्यांनी आज सभागृहात घेतली ती खेदजनक आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:सभा तहकूब करावी स.सदस्य श्री.सूरे यांचे वार्डातील पाणीप्रश्न सोडवावा.

श्री.संजय जगताप : सभा तहकूब करावी.

मा. महापौर : २० मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दु. ४.१० वा.सभेला सुरूवात ४.५० वाजता.)

श्री.सिताराम सुरे : मागिल सर्वसाधारण सभेत आठ दिवसात पाणी दिले जाईल असे आपण म्हटले होते पाणी मिळाले नाही. १६ तारखेला पदाधिकारी तसेच मा.आयुक्त यांना मी लेखी निवेदनही दिले लिगल वसाहत आहे. त्या लोकांनी बेटरमेंन्ट चार्जेस भरणा केलेले आहे. जो पर्यत त्या भागात पाणी दिले जात नाही तोपर्यत सभेचे कामकाज चालवू नये अशी माझी मागणी आहे.

मा. महापौर : मयूर पार्कला पाणी देण्या संदर्भात आताच अॅन्टी चेंबर मध्ये काही नगरसेवकासह चर्चा केली त्याचे म्हणणे काय आहे ऐकून घेवू.

श्री. रविकांत गवळी : या सभेपर्यत पाणी मिळाले नाही तर मागिल सभेत आत्मदहन इशारा दिला होता. त्यांनी प्रयत्न ही केला गेला. सिडको हडको व मयूरपार्क ला पाणी पूरवठाकरण्या संदर्भात एक वर्षापूर्वी बैठकही घेण्यात आलेली होती. प्रत्येक वेळी असे सांगण्यात आले की ३० मिनिटे पाणी आणखी कमी करणार आहोत. मूळातच ३५ एमएलडी पाणी सिडको हडको भागासाठी पाहिजे ते २८ एमएलडी येते. ४५ मिनिटे पाणी येते त्यातूनही पाच ते दहा मिनिटे पाणी कमी करण्यात येईल असे म्हटले जाते. कमी दाबाने पाणी येत असल्याने पाणी मिळत नाही. दिल्लीगेट पाण्याची टाकी ते ते हर्सूल टीपॉईन्ट ते एन -७ पर्यतच्या टाकीपर्यत १४०० मी.मी.ची दोन पाईप लाईन होती. टी.व्ही. सेन्टर पर्यत ७०० मी.मी.ची पाईपलाईन होती,त्यापूढे ३५० मी.मी. व्यासाची जलवाहीनी आहे. या पाईपलाईनवर अनेक अनधिकृत नळ कनेक्शन असून जवळपास ६०० ते ७०० अनधिकृत नळ जोडणी आहे. काही ठिकाणी एक,दोन,तीन इंचचे कनेक्शन घेतलेले आहे.

मा.महापौर : अनधिकृत नळ जोडणी तोडली तर पाणी मिळेल. प्रशासनाने नोंद घ्यावी.

श्री.रविकांत गवळी : पाण्याच्या टाकीपासून जी पाईप लाईन आहे ती अनेक वसाहतीत पाणीपूरवठा करणारी असल्यामूळे १८ ते १९ तास या पाईपलाईनला पाणी राहते. ज्यांनी अनधिकृतरित्या नळ घेतले, त्यांना १६ तास पाणी व जे १८०० रू. भरणा करतात त्यांना एक दिवसाआड पाणी हे योग्य नाही. या पाईपलाईनवरील अनधिकृत नळ कनेक्शन बंद केले,तर मयूर पार्कला पाणी दिले जाईल. टी पॉईन्टला अजिंठा फार्म म्हणून आहे २ इंची कनेक्शन ११ तास पाणी चालू असते. एका अधिकाऱ्यांना दाखविले होते. अदयाप बंद केलेले नाही. बंद करण्याची इच्छा नाही,परंतू नगरसेवकांनी म्हटल्यानूसार करीत आहे असे संबधीत व्यक्तीला अधिकारी जावून सांगतात.

श्री.संजय जोशी : खुलासा करण्यात यावा.

शहर अभियंता : २१ ते २२ तास पाणी त्या लाईनला चालू असते. अनधिकृत नळ कनेक्शन त्या पाईपलाईनवर आहे. ते कनेक्शन बंद करण्यासाठी महापालिकेचे कर्मचारी गेले असता बराच विरोध झालेला होता.त्यामूळे कार्यवाही झालेली नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : कूणी विरोध केला होता त्यांचे नाव घेण्यास हरकत नसावी.

शहर अभियंता : विरोध कूणी केला हे माझ्याकडे माहिती नाही परंतू विरोध झालेला होता.

श्री.किशनचंद तणवानी : लोकप्रतिनिधीनी केला की नागरीकांनी विरोध केला.

मा.आयुक्त : जरी विरोध झाला असेल तरी शहरातील जेवढेही अनधिकृत नळ कनेक्शन असतील प्रथमत: त्या भागातील काढले जातील. आज पासून ७ दिवस मोहिम सूरू होईल. सर्व २९ पोलीस कर्मचारीही संरक्षणासाठी दिले जातील. मोहिम संपल्यानंतर जर अनधिकृत नळ कनेक्शन दिसून आल्यास कार्यवाही होईल. विरोध होत असेल तर पाचही पदाधिकाऱ्याना फोनवर कळवून माहिती दयावयास पाहिजे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : काही भागात दररोज पाणी दिले जाते. काही भागात एक दिवसाआड पाणी दिले जाते. जेथे एक दिवसाआड पाणी दिले जाते त्या नागरीकाकडून सहा महिण्याचीच पाणीपट्टी वसूल करावी. नसता सर्वांना एक दिवसाआडच पाणी दयावे.

श्री. रविकांत गवळी : अनधिकृत नळ कनेक्शन काढल्यानंतर पून्हा ८ तासानंतर नळ कनेक्शन घेतले जाते या बाबतीत काय कार्यवाही करणार आहे.

मा. महापौर : अनधिकृत नळ कनेक्शन कट केल्यानंतर पून्हा घेतल्यास पोलीसात गून्हा नोंदवावा.

मा. आयुक्त : पाणी चोरीचा गून्हा दाखल केला जाईल.

श्री.प्रशांत देसरडा : स.श्री.सिताराम सूरे यांनी त्यांचे वार्डात पाणी मिळावे म्हणून दोन वर्षापासून प्रयत्न करीत आहे. सदरील भाग हा लिगल असून १.५० कोटी रूपये बेटरमेंन्ट चार्जेस महापालिकेस मिळालेले आहे. आताच म्हटले की ६०० अनधिकृत नळ कनेक्शनस् आहेत. १४०० व ७०० मी.मी. व्यासाचे मुख्य जलवाहीनी वरून जायकवाडी पासून ते नक्षत्रवाडीपर्यत २५ एम.एल.डी. पाणी फॅक्ट्रींना दिले जाते. तसेच गावांना पाणी दिलेले आहे. नगरसेवकांना आत्महत्या करावी लागते. ते नळ कनेक्शन बंद करून तेच पाणी शहरातील नागरीकांना देण्यात यावे. शहरातील नागरीकांचे हित महापालिकेने जपावे. त्यांचेकडून २ कोटी रूपये मिळते असा खूलासा होतो. परंतु शहराला पाणी मिळावे. आपण कंपन्यांना व एम.आय.डी.सी. ला देतो. जायकवाडी ते नक्षत्रवाडी सर्व अधिकृत व अनधिकृत नळ जोडणी बंद करावे.

श्री.संजय सिरसाट : ते कनेक्शन बंद केल्यास पाण्याच्या फोर्समूळे पाईप लाईन फुटेल व येणारे उत्पन्नही येणार नाही याचीही काळजी घ्यावी.

श्री.अ.रशिद खॉन : ज्याचे अनधिकृत नळ कनेक्शन आहे त्याचेवर कार्यवाही करणार हे बरोबर असले तरी ज्या नागरीकांना दररोज पाणी देण्याचे निश्चीत केलेत्यांना एक दिवसाआड पाणी दिले जाते तेही कमी दाबाने त्यांनी कुणावर गुन्हा दाखल करायचा. एक

दिवसाआड पाणी देणार असेल तर ९०० रू. टॅक्स घेण्यात यावा. जेथे पाणी देवू शकणार नव्हते तर बेटरमेंन्ट चार्जेस का वसूल केले.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : आजपर्यत दोन नगरसेवकांना पाण्याच्या बाबतीत आत्महत्या करण्याची वेळ आली. स.सदस्या सौ.संगिता जाधव व स.स.श्री.सिताराम सुरे यांना आत्महत्या करण्याची वेळ आली, येत्या तीन वर्षात अनेक स.सदस्यांना आत्महत्या करण्याची वेळ येवू शकते. या सभैमध्ये महत्वाचे निर्णय घेतले जातात त्याची अमलबजावणी होत नाही. चर्चा होते कमेटी नियुक्त केली जाते. सदस्यांना कमेटीवर नियुक्ती बाबत पत्रही दिले जात नाही. श्री.निकम यांचे बाबतीत कमेटी केली होती त्यात माझेही नाव होते आजपर्यत मला पत्र आलेले नाही. मी स्वत: पैसे खर्च करून नळ कनेक्शबाबत माहिती घेतली आपल्याकडे माहिती देवूनही आजपर्यत एकाही नळाचे वसूली केलेली नाही. गरीबांचे नळ कनेक्शन लगेच पथक जावून कट करते परंतू मोठमोठे लोकांचे नळ कनेक्शन कट केले जात नाही. समातंर जलवाहिनी होणे जरूरी आहे. १९७५ सालची जुनी पाईप लाईन आहे २०१० पर्यत चालू शकत नाही.

श्री.सिताराम सुरे : मयुरपार्क भागात पाणी दयावे ही माझी मागणी आहे.

श्री.कवरसिंग बैनाडे : सर्वांना विनंती आहे, हे माझे वैयक्तीक मत आहे की, अर्थसंकल्पातील सांस्कृतिक हॉल व सभागृह बांधणे असे प्रत्येक सदस्यांच्या वार्डात कामे आहे ती कामे या वर्षी न करता हा निधी समातंर जलवाहिनीसाठी वळती करून नागरीकांचा पाण्याचा प्रश्न सुटेल. जास्त प्रमाणात पाणी मिळेल. पाईपलाईनही वारंवार फुटणार नाही. सदर निधी वळती करता येईल प्रशासनाचे मत घ्यावे.

श्रीमती मेहरून्नीसा बेगम : ३०० कोटीचे बजेट करीत आहात. ३ दिवसापासून पाणी नाही.

श्री.सलिम खान : स.सदस्य श्री.सुरे यांचे प्रकरणात निर्णय घ्यावा.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:श्री.सिताराम सुरे यांचे वार्डात पाणी कसे देणार या बाबतीत चर्चा चालू आहे. पाणी कोठून दयायचे यावर चर्चा होत आहे. जलवाहिनीसाठी सहा महिण्यापासून प्रयत्न चालू आहे. ४० कोटी शासन देण्यास तयार असून ४० कोटी महानगरपालिकेने तरतूद केली तर ८० कोटी होतात. यासाठी वेळ लागणार आहे. बीओटीवर केले तर पाणीपट्टीत वाढ होईल.उत्पना पेक्षा पाणी पूरवठा करण्याचा महापालिकेला खर्च जास्त आहे.लाखो निधी पाण्यासाठी खर्च करीत आहे. हा पूर्ण शहराचा प्रश्न आहे. पाणी कोठून कमी करायचे व कूठे दयायचे ही प्रशासकीय बाब आहे. माझ्या वार्डात जास्तीचे पाणी येते असे कूणी ही मान्य करणार नाही. चर्चा करून श्री.सुरे यांचे वार्डातील पाण्याचा प्रश्न सोडवावा. काही प्रभागात दररोज पाणी येते. इतर भागात येत नाही. २-४ दिवसात रिव्हयु कमेटी करून घ्यावे.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : आमच्या सारखा पाणी पुरवठा त्यांनाही करण्यांत यावा. ०१ दिवस पाणी द्यावे. एक दिवस बंद ठेवावे. अन्यथा सतत बील देण्यात यावे. अनधिकृत नळ कनेक्शन कुणाचेही असेल ते बंद करावे.

श्रीमती मेहरून्नीसा खान : अनेक भागात लेआऊट झालेल्या ठिकाणी जलवाहिनी टाकलेली नाही. २० ते २५ मिनिटे पाणी दिले जाते पुरेसे पाणी दिले जात नाही म्हणून वसूली होत

नाही.काही भागात दररोज पाणी दिले जाते ते कमी करून इतर ठिकाणी सर्व भागात समसमान पाणी दयावे. पूर्ण वर्षाची पाणीपट्टी घेतली जाते परंतू पाणी एक दिवसा आठ दिले जाते. हे योग्य नाही.

श्री.सलीम खान : स. सदस्य श्री. सुरे अनेक वेळ पासून उभे आहे त्यांचे वार्डातील पाण्याचा प्रश्न सोडवावा.सर्वच शहरातील पाणी पुरवठयावर चर्चा होत आहे.लाखो निधी खर्च होतो गरीबांना पिण्याचे पाणी मिळत नाही. त्यासाठी उपाययोजना करावी.

सौ.मोमीन सफिया फिरदोस: माझ्या वार्डात दोन तीन दिवसाआड पाणी येते.बाजूच्या वार्डात दोन वेळेस पाणी येत आहे. (याच वेळी मा. महापौर डायससमोर स. सदस्य मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही. )

श्री.किशनचंद तनवाणी : मयुरपार्क भागात पाणी देण्या संदर्भात प्रशासनाची काय भूमिका आहे.

श्री.संतोष खेंडके : स. सदस्य श्री. सुरे यांचे वार्डात पाणी देण्या संदर्भात रूलींग दयावे.

मा. महापौर : प्रशासनाने म्हटल्याप्रमाणे जे काही ५०० ते ७०० च्या दरम्यान अनधिकृत नळ कनेक्शनस् आहेत, ते बंद करून मयूरपार्कला तात्काळ पाणी देण्यात यावे. आज पासून सात दिवसाच्या आत कार्यवाही करावी.

श्री.किशनचंद तनवाणी : उपआयुक्त (म) श्री.अरूण आनंदकर यांना मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव या सभागृहासमोर आलेला नाही. म्हणून या सभागृहाने ठराव घेवून त्यांना परत पाठविण्याचा निर्णय घेतला होता. विधान सभा अधिवेशन संपल्यानंतर त्यांना कार्यमूक्त करण्यात येईल असे आपण मागिल बैठकीत रूलींग दिले होते अदयापपर्यत त्यांना कार्यमुक्त का कारण्यात आले नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : माझ्या माहिती प्रमाणे आपण शासनाकडे मागणी केली असून जोपर्यत शासनाचे अधिकारी येथे रूजू होत नाही तोपर्यत उपआयुक्त श्री.अरूण आनंदकर यांना कार्यमुक्त करू नये. ठराव घ्यायचा व वैयक्तिक त्यावर वारंवार चर्चा करणे योग्य नाही.

श्री. किशनचंद तनवाणी : सर्व सदस्यानी मिळून या सभागृहात ठराव घेतला आहे,वैयक्तीक नाही. मार्च पर्यत त्यांना मुदतवाढ दिली होती. त्यांनतर प्रशासनाचा प्रस्ताव का आलेला नाही नियमानूसार मुदतवाढीसाठी प्रस्ताव येणे आवश्यक होते. तो आला नाही म्हणून या सभागृहाने ठराव घेवून त्यांना परत पाठविण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याची अमलबजावणी व्हावी. महानगरपालिकेचे कायद्यात काय तरतूद आहे. मा.आयुक्तांनी खुलासा करावा. मागच्या मार्च महिन्यापासून आतापर्यंत मुदत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : शासनाकडून १० वर्षे अधिकारी येणार नाही. शासनाचे अधिकारी येतील तेव्हा येतील सभागृहाने त्यांना परत पाठविण्याचा ठराव घेतलेला आहे त्याची अंमलबजावणी व्हावी.

श्री.काशिनाथ कोकाटे : पाणी प्रश्न जिव्हाळयाचा आहे. श्री. सुरे यांचे वार्डात उद्या पाणी देण्याची कार्यवाही मा.आयुक्तांनी करावी. पाण्याचा प्रश्न महत्वाचा असतांना देखिल इतर प्रश्न उपस्थित होतात. मागिल मार्च महिण्यापासून एक वर्षासाठी मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव नामंजूर केला. शासनाकडे पाठवून तो विखंडीत करण्यात आला.

तरीही प्रशासनाने सभागृहाला माहिती दिली नाही. वारंवार माहिती मागीतली मिळाली नाही. जाणूनबूजून एखादया अधिकाऱ्याच्या संदर्भात चर्चा करून टारगेट करणे बरोबर नाही. स.स. श्री.तनवाणी जेंव्हा महापौर होते, त्याचवेळी निर्णय घ्यायचा असता. सभागृहाचे आदेश पाळले पाहिजे. अशी भूमिका त्यावेळीच का घेतलेली नाही. आजच का घेता. ज्यांना वाटेल अमुक अधिकारी काम करीत नाही म्हणून आरोप करावे म्हणून केले जाते. प्रशासन नियमाप्रमाणे काम करीत असेल तर हस्तक्षेप करू नये. अधिकारी चूकीचे काम करीत असेल तर कार्यवाही व्हावी. अनेक वेळा सभागृहात निर्णय झाले त्या संदर्भात कार्यवाही झालेली नाही. माझ्या माहिती प्रमाणे आताच म्हटल्याप्रमाणे ६०० अनधिकृत नळ कनेक्शन आहे,कोठे आहे. अंदाजे बोलणे योग्य नाही प्रत्यक्षात असावयास पाहिजे.

श्री.संतोष खेंडके : अनधिकृत नळ कनेक्शन असल्याचे अधिकाऱ्यांनी कबुल केले. कार्यवाही करण्यास गेलेलेवर कुणी दबाव आणला सीआयडी मार्फत चौकशी करावी. अनधिकृत वसाहतीत पाणी दिले जात नाही. कार्यालयात बसून अमुक नळ कट करावे म्हणून आदेशीत करणे बरोबर नाही. अनधिकृत वसाहतीत पाणी नाही. चोर सोडून सन्यासास फाशी असे होता कामा नये.

श्री.काशिनाथ कोकाटे : श्री.आनंदकर हे छोटे व्यक्ती आहे,एवढी चर्चा वारवांर त्यांचे बाबतीत घडवून आणणे योग्य वाटत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : श्री. अरूण आनंदकर यांना एक वर्षासाठी मूदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर मुदतवाढ घेणे गरजेचे होते. मुदतवाढीचा तसा प्रस्ताव आला नाही म्हणून श्री.तनवाणी माजी महापौर यांचे कार्यकाळात सभागृहाने श्री.अरूण आनदंकर यांना या महानगरपालिकेतून कार्यमूक्त करण्यात यावे असा ठराव घेतला तो ठराव शासनाने विखंडीत केला ही माहिती सभागृहाला देण्यात आलेली नाही.तसेच तत्कालीन महापौर यांनी लेखा विभागास श्री.अरूण आनंदकर यांना या सभागृहाने कार्यमूक्त केले असून त्यांना पगार देण्यास ही महापालिका बांधील नाही. असे लेखी पत्र दिले होते. एवढे होवूनही त्यांचे बाबतीत शासनाने काय निर्देश दिले याची माहिती आजपर्यत सभागृहाच्या पटलावर आलेली नाही.सभागृहातील सदस्य हे कूणाच्याही विरोधात नसून या सभागृहाचा मान अपमान व अधिकार या बाबतीत मी बोलत आहोत. शासनाकडील माहिती न देण्यामागे प्रशासनाची भुमिका काय होती. खुलासा घेण्यात यावा.

श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर :महानगरपालिकेचे कामकाज हे शासनाच्या अधिपत्त्याखाली चालते की नाही याचा खूलासा घ्यावा जे अधिकारी कर्मचारी आहे ते शासनाचे सेवक आहेत. सभागृहाने घेतलेल्या निर्णय हे शासनाच्या नियमात बसत नसेल व त्या बाबतीत नेहमी दबाव येत असेल तर योग्य नाही. अनेक निर्णय सभागृहात यापूर्वी घेतले त्याबध्दल काय कार्यवाही झालेली आहे. ते ही बघावे.

मा. आयुक्त : मागिल बैठकीत श्री.अरूण आनंदकर व श्री.कमलाकर फड यांना मूदतवाढ न देता शासन सेवेत परत पाठविण्याचा ठराव या सभागृहाने घेतलेला होता. त्याची प्रत शासनाकडे पाठविलेली आहे नियम ४५ अंतर्गत नूसार उपआयुक्त पद असे

आहे की त्यास  सभागृहाची तसेच शासनाची सूध्दा मंजूरी लागते.जो ठराव या सभागृहाने घेतलेला आहे त्याची माहिती शासनास कळविलेली आहे. तसेच शासन स्तरावर तोंडी चर्चा सुध्दा झाली असून जो पर्यत शासनाचे आदेश येत नाही तो पर्यत त्यांना कार्यमुक्त करणे योग्य होणार नाही.

श्री.रेणूकादास वैद्य :महानगरपालिकेने कार्यमूक्त करण्याचा निर्णय घेतला पोस्टींग देणे किंवा न देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी होवू शकत नाही.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय: शासनाने नियुक्ती करणे किंवा न करणे याचा महानगरपालिकेशी काहीही संबध येत नाही. ॲक्टमध्ये असे दिले की,कोणत्याही महानगरपालिकेने एखादया अधिकाऱ्याबध्दल बहुमताने निर्णय घेतला तर त्यास तात्काळ कार्यमूक्त करावे. शासनाच्या आदेशाची गरज नाही. त्यांचेकडून आम्हाला काम घ्यायचे नाही. सर्वानी मिळून उपआयुक्त यांचे दालनास कुलूप लावावे. सभागृहात आपसात आपले भांडण नको. आयुक्तही तीन वर्षानंतर बदली होणारच आहे. जो निर्णय सभागृहाने घेतला त्यास प्रशासन बंधनकारक राहील.

श्री.किशनचंद तणवानी : मागिल वर्षी ठराव घेतल्यानंतर पून्हा एक वर्ष होवून गेले. मुदतवाढ मागविली नाही सभागृहात उपआयुक्त महसूल हे अनधिकृत रित्या बसलेले आहे असे माझे मत आहे. या सभागृहाने ठराव घेतलेला आहे शासनाशी आपण स्वत: चर्चा करावी. संबधीत अधिकारी यांना कार्यमूक्त करावे. नवीन अधिकारी येईपर्यत दुसरे उपआयुक्त यांचेकडे त्यांचेकडील चार्ज देण्यात यावा.शासनाने प्रस्ताव विखंडीत केल्यानंतर पून्हा सभागृहाने मुदतवाढ का मागविली नाही. सभागृहाने त्यांना मुदतवाढ दिलेली नाही. कार्यमुक्त करावे.

मा. उपमहापौर : या सभागृहातील लोकप्रतिनिधी हे या शहरातील नागरीकांनी निवडून दिलेले आहे. सभागृह म्हणजे या शहराची संसद आहे असे आपण मानतो. शासनाकडून महानगरपालिकेत अधिकारी पाठविल्यानंतर जसा कार्यकाळ कायम करतो त्याच प्रमाणे मुदतवाढही कायम करते असतो. संबधीत अधिकारी यांना महानगरपालिकेतच ठेवावे असा म्हणण्याचा अधिकार शासनाचा नाही. हा अधिकार या सभागृहाचा आहे.नियमावलीत सूध्दा तसे नमूद आहे.  त्यांना कार्यमूक्त केल्यानंतर कोणत्या विभागात दयायचे हा अधिकार शासनाचा नक्कीच आहे याबध्दल दुमत नाही. सन १९८८ मध्ये ही अशाच प्रकारे एका अधिकाऱ्याच्या बाबतीत निर्णय झालेला होता व शासनाने त्यांची नोंद घेवून त्यांना रजेवर पाठवून नंतर दूसऱ्या विभागात नियुक्ती दिली होती.त्याच अनुशंगाने या बाबतीत निर्णय घेतला पाहिजे. सभागृहाने घेतलेल्या निर्णयाची अमलबजावणी व्हावी.

श्री.संतोष खेंडके :१९९२ ला श्री. पंडित  शिक्षणाधिकारी यांना कार्यमूक्त करण्यात आले होते. त्या प्रमाणेच उपआयुक्त महसूल यांनाही कार्यमूक्त करू शकतो.

श्री.काशिनाथ कोकाटे : एक वर्षापूर्वी ठराव घेतला होता. कार्यमूक्त करण्या बाबत आजच का मागणी होत आहे.निर्णय घेतांना विचारपूर्वक घ्यावा कुणाच्याही दबावाखाली येवू नये.

श्री.सलीम खॉन : या विषयावर खूप चर्चा झालेली असून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

मा.महापौर : उपआयुक्त श्री.अरूण आनंदकर यांना कार्यमूक्त करण्याचा या सभागृहाने मागिल सर्वसाधारण सभेत तसा ठराव मंजूर केलेला आहे. श्री.अरूण आनंदकर यांना त्वरीत कार्यमूक्त करण्यात यावे.

श्री.संतोष खेंडके : उपआयुक्त (म) श्री.अरूण आनंदकर यांना जो पर्यत कार्यमूक्त करीत नाही तोपर्यत ही सभा चालवू नये.

मा. महापौर : आजची सभा तहकूब करण्यात येते.

या बरोबरच आजची सभा तहकूब करण्यात येत असल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद.